सकाळ

**२७ जानेवारी २०२० ला ग्रामीण कवयित्री शकुंतलाताई वाघ यांचा 'माझ्या हिरदिची उकळी' हा शब्दमल्हार प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेला लोकगीते आणि जात्यावरच्या ओव्या या संकलित संग्रहाचे लोकार्पण मराठीच्या स्वनामधन्य लेखिका व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा अरुणा ढेरे यांच्या हस्ते महाकवी कालिदास कलामंदिर येथे होत आहे. या पुस्तकाच्या लोकार्पणाच्या निमित्ताने कवयित्री शकुंतलाताई वाघ यांच्या सृजनप्रवासावर टाकलेला हा प्रकाश...**

# नव्या-जुन्याचा संगम घडविणारी कवयित्री : शकुंतलाताई वाघ

पद्मश्री (कै.) काकासाहेब वाघ यांच्या स्नुषा आणि के. के. वाघ शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या पत्नी शकुंतलाताई वाघ म्हणजे पूर्वाश्रमीच्या पाटील. पूर्वाश्रमीच्या शकुंतला पाटील जेव्हा शकुंतला वाघ झाल्या, त्या वेळी सामाजिक आणि शैक्षणिक अंगाने मोठे स्थित्यंतर होते. काकासाहेबांचा त्या वेळचा दरारा, संपूर्ण महाराष्ट्राशी असलेले त्यांचे राजकीय, सामाजिक संबंध आणि त्यांची धडाकेबाज नेतृत्वशैली यामुळे काकासाहेबांचे कुटुंब म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातल्या जुन्या-जाणत्या नेत्यांचे, पुढाऱ्यांचे हक्काचे घर होते. (कै.) भाऊसाहेब हिरे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, वसंतदादा पाटील यांच्यासारखे



शकुंतला वाघ

सहकार चळवळीतील समाजधुरिण नेते या सर्वांचा काकासाहेबांच्या घरी राबता होता. येणाऱ्या-जाणाऱ्या वरिष्ठांचा मानसन्मान आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा भार तोलताना शकुंतलाताईंच्या संवेदनशील मनावर समाजपरिवर्तनाचे संस्कार बेमालुमपणे होत गेले. पण यातून त्यांच्यातील सुप्त कवयित्री आतल्या आत धुमसतच होती.

जुन्या काळातील सहकार चळवळ म्हणजे कबिरांच्या भाषेत सांगायचं तर 'जो घर फुके अपनो, चलो हमारे साथ' अशीच होती. एका सामान्य गृहिणीची जी घालमेल, घुसमट आणि द्वंद्वात्मक अवस्था होते. त्या साऱ्या अवस्थेतून सौ. शकुंतलाताईंचा प्रवास झाला. प्रतिकूल परिस्थितीशी झुंजण्याचे बळ त्यातून मिळत असे. अर्थातच जात्यावरचे दळण दळणाऱ्या शकुंतलाताई स्वतःही एक भाग होत्या. या ओव्यांचे, लोकगीतांचे बोल त्यांच्या स्त्रीसुलभ कवयित्री मनावर उमटत गेले आणि त्यातूनच ओव्या व लोकगीतांबद्दल त्यांच्या मनात अतूट भावसंबंध निर्माण झाले. त्या भावसंबंधांचे प्रकटीकरण प्रस्तुत पुस्तकात जागोजागी प्रतिबिंबित झालेले दिसून येते.

शब्दांकन : **संजीव अहिरे**

जनसंपर्क अधिकारी, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

Nashik, Nashik-Today
26/01/2020 Page No. 2